पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना 'नारायणी' पुरस्कार प्रदान करताना अशोक नारायण कुलकर्णी-लातूरकर, विनायक कुलकर्णी व गुरुनाथ मिरजगावे.

पुढारी

# कुलगुरू डॉ. शिंदे यांना 'नारायणी' पुरस्कार प्रदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना लातूरच्या स्वातंत्र्यसैनिक नारायणराव भगवंतराव कुलकर्णी-गौरकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा नारायणी पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

अशोक नारायण कुलकर्णी-लातूरकर यांच्या हस्ते आणि विनायक कुलकर्णी व गुरुनाथ मिरजगावे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार कुलगुरू डॉ. शिंदे यांना त्यांच्या दालनात प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार गतवर्षी कुलगुरू डॉ. शिंदे यांना जाहीर झाला होता. परंतु, पूर्वनियोजित बैठकीमुळे कुलगुरू डॉ. शिंदे पुरस्कार वितरण समारंभाला उपस्थित राहू शकले नव्हते. यापूर्वी हा पुरस्कार माजी मुख्यमंत्री (कै.) विलासराव देशमुख यांच्यासह भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील, लातूरच्या स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जी. एम. वाघमारे, साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी के. डी. कुलकर्णी आदींना देण्यात आला आहे.

पुढारी

# प्रतिनिधित्व, पर्याप्त सहभाग हा आरक्षणाचा मूळ हेतू

## डॉ. हेमंत तिरपुडे; विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजातील वंचित घटकांना योग्य प्रतिनिधित्व व पर्याप्त सहभाग मिळवून देणे हा आरक्षण धोरणाचा हेतू आहे. दारिद्र्य निर्मूलन हे मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे धोरणे राबवून घडवून आणले पाहिजे, असे प्रतिपादन संविधान धोरण तज्ज्ञ व कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे आयुक्त डॉ. हेमंत तिरपुडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या 'आरक्षणाचे संवैधानिक धोरण' या विषयावरील कार्यशाळेत डॉ. तिरपुडेहेप्रमुखवक्ते म्हणून बोलत होते. वि. स. खांडेकर सभागृहात झालेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. डॉ. तिरपुडे म्हणाले, आरक्षणाचे धोरण हे आपल्या देशाचे राष्ट्रीय धोरण आहे. याबाबत समाजात जागरुकता निर्माण करावी लागेल. आरक्षण हे जातीवर आधारित नाही. आरक्षण आणि सवलत हे दोन्ही वेगळे आहेत. आरक्षण हे फक्त १० वर्षासाठी नाही आणि आरक्षणाचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त असू शकते. परंतु याबाबत गैरसमज निर्माण झालेले आहेत ते दूर करावे लागतील. बदललेल्या आर्थिक धोरणांमुळे एकूण रोजगाराच्या दोन टक्के रोजगारामध्ये आरक्षण उरले आहे. कस्टम व जी एस टी पुणेचे आयुक्त अश्विनकुमार उके, कराडमहापारेषणचे अधिक्षक अभियंता रंगनाथ चव्हाण, गोवा सरकारचे सचिव सगुण वेलीप यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

स्वागत व प्रास्ताविक केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. आभारप्रदर्शनप्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन वैभव कांबळे यांनी केले. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती होती.

# लघुउद्योजकांना दिले बळ

## लोकविकास केंद्रात कौशल्य निर्मितीसाठीचे ३० अभ्यासक्रम सुरू

**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT

**कोल्हापूर :** कौशल्यविकासाला चालना देणारे आणि रोजगारनिर्मितीला पूरक ठरणाऱ्या कमी कालावधीच्या अभ्यासक्रमांमधून शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्राने २० हजार लघुउद्योजक घडवले आहेत. गेल्या १८ वर्षात ३० विविध उपयुक्त अभ्यासक्रमांच्या माध्यमातून युवकांसह महिलांना आर्थिक उत्पन्नाचे स्रोत मिळाले आहेत.

नोकरी व रोजगार असे दोन्ही पर्याय शोधणाऱ्यांसाठी अल्प कालावधीचे कोर्स उपलब्ध व्हावेत या उद्देशाने २००० साली शिवाजी विद्यापीठातर्फे लोकविकास केंद्राची स्थापना करण्यात आली. विद्यापीठ व समाजातील रोजगारक्षम गरजू यांच्यातील दुवा साधणाऱ्या लोकविकास केंद्रामार्फत अभ्यासक्रमांसह शिबिरे व कार्यशाळा राबवल्या जातात.

लोकविकास केंद्रात एक वर्ष, सहा महिने व तीन महिने अशा कालावधीचे ३० अभ्यासक्रम चालवले जात आहेत. यामध्ये बालवाडी शिक्षिका, औषधी वनस्पती ओखळ व संवर्धन, उद्यानविद्या, किचन गार्डनिंग, रोपवाटिका व्यवस्थापन, अभिनय कौशल्य, आरोग्य सहाय्यक, कॅथ लॅब असिस्टंट, डायलिसिस तंत्रज्ञ, रेडिओलॉजिस्ट, समुपदेशन कौशल्ये, पंचकर्म, पॅरामेडिकल मेडिकल सर्व्हिसेस यासह अन्य अभ्यासक्रमांचा समावेश आहे. यापैकी काही अभ्यासक्रम केंद्रात तर काही अभ्यासक्रम स्वयंसेवी संस्था, हॉस्पिटल यांच्या सहकार्याने सुरू आहेत.

लोकविकास केंद्रातर्फे सुरू असलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन छोटे उद्योग सुरू करणाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय आहे. केंद्राच्या अभ्यासक्रमांचा उपयोग करून संबंधित क्षेत्रात नोकरीसह स्वतंत्र उद्योग सुरू करण्यामध्ये पुरूषांची संख्या ५६ टक्के तर महिलांची संख्या ४४ टक्के आहे. पॅरामेडिकल कोर्स पूर्ण करून हॉस्पिटलमध्ये नोकरी मिळालेल्या तसेच स्वतंत्र व्यवसायाची निवड करण्यामध्ये युवक व युवतींचे प्रमाण चांगले आहे. जवळपास अडीच ते तीन हजार विद्यार्थ्यांनी हॉर्टिकल्चर, ड्रेस डिझायनिंग, फिटनेस, न्यूट्रीशन अँड डायटेशियन या अभ्यासक्रमांची निवड करून स्वयंरोजगाराला प्राधान्य दिले आहे.



### वेगळेपणातून स्वावलंबन

महाविद्यालयीन तरूणींसाठी सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग फॉर गर्ल्स हा १५ दिवसांचा अभ्यासक्रम लोकविकास केंद्रात कार्यान्वित आहे. विद्यापीठातील वसतिगृहातील मुलींसोबत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील २०० मुली या अभ्यासक्रमाद्वारे प्रशिक्षित झाल्या आहेत. नॅब या अंधासाठी काम करणाऱ्या संस्थेमार्फत ब्रेल लिपी प्रशिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या उल्लेखनीय आहे. या अभ्यासक्रमानंतर अंध मुलांसाठी ब्रेल लिपीत पुस्तके तयार करण्याचे काम १२ तरूण करत आहेत.

### मतिमंद मुलांसाठी उद्यानविद्या

सांगली येथील मतिमंद मुलांसाठी उद्यानविद्या हा अभ्यासक्रम केंद्राने तयार केला असून यातील ४ विद्यार्थी सांगलीतील सार्वजनिक उद्यानात लावण्यासाठी रोपे तयार करत स्वावलंबी झाले आहेत. शेतकरी व शेतीपूरक उद्योग करणाऱ्या कुटुंबातील युवकांसाठी मधमाशा पालन व ऑरगॅनिक फार्मिंग हे वर्ग सुरू असून दीडशे शेतकरी प्रशिक्षित झाले आहेत. कोल्हापुरी चप्पल, चांदीचे दागिने या पारंपरिक उद्योगाला आधुनिक जोड देणाऱ्या अभ्यासक्रमांमुळे नवी पिढी काम करत आहे. गगनबावडा तालुक्यातील ५० महिलांनी परसबाग फुलवणे व नाचणीच्या पदार्थ शिक्षणातून व्यवसायाचे धडे घेतले आहेत. घरगुती कचरा व्यवस्थापन व किचन गार्डनिंग या अभ्यासक्रमाची सध्या ११ वी बॅच सुरू असून ५०० गृहिणी कचऱ्यापासून खत तयार करत आहेत. घरच्या कचऱ्यातून टेरेस गार्डन, परसबाग येथे फळझाडे व फुलझाडांची निर्मिती केली आहे.

लोकमत

# मातृभाषाच आपले व्यक्तिमत्त्व घडवते

## राजन गवस : विधि सेवा प्राधिकरणतर्फे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जेव्हा एक भाषा संपते तेव्हा एक संस्कृती संपते. आपण कोणत्याही भाषेचे असू; ती मातृभाषाच आपले व्यक्तिमत्त्व घडवत असते. कधीकाळची वैभवसंपन्न मराठी भाषा संपू नये याकरिता आपण सर्वांनी जागे होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी केले.

जिल्हा विधि सेवा प्राधिकरणातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश आदिती कदम होत्या.

डॉ. गवस म्हणाले, छोट्या-छोट्या समूहांच्या भाषा नष्ट होत आहेत. या नष्ट होण्याची गती प्रचंड आहे. या भाषा नष्ट होता-होता जगात एकच भाषा उरावी व माणूस हा माणूस न राहता फक्त ग्राहक व्हावा, त्याची एकच भाषा असावी, असे प्रयत्न भांडवली व्यवस्थेने जाणूनबुजून चालविले आहेत. आपल्यातील भाषिक न्यूनगंड संपायला हवा. यावेळी जिल्हा न्यायाधीश बी. डी. शेळके, ए. एम. रोटे, बी. डी. कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात दूरशिक्षण केंद्राच्या उद्यापासून परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दूर शिक्षण केंद्राच्या परीक्षा १८ जानेवारीपासून सुरू होत आहेत. बी.कॉम., एम.कॉम., एम.ए. भाग १ व सत्र १ साठी या परीक्षा होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रसिद्धीस दिली आहे. परीक्षा १९ अभ्यासकेंद्रांवर होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JAN 2019
पुण्यनगरी

# दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षा १८ पासून

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या बी.कॉम, एम.कॉम आणि एम.ए (मराठी, हिंदी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इतिहास) भाग १, सत्र १ च्या परीक्षा दि. १८ जानेवारीपासून सुरू होत आहेत. दूरशिक्षण केंद्राच्या २१ अभ्यास केंद्रांवर या परीक्षा होणार आहेत.

या परीक्षांसंदर्भातील सर्व माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. परीक्षेसाठी येताना विद्यार्थ्यांनी ओळखपत्र सोबत आणावे तसेच परीक्षेबाबत अधिक माहिती हवी असल्यास दूरशिक्षण केंद्रांशी संपर्क साधावा, असे आवाहन परीक्षा आणि मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी केले आहे.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षा उद्यापासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुक्रवार (दि. १८) पासून सुरु होणार आहेत. या अभ्यासक्रमांमध्ये बी. कॉम., एम. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास) भाग एक, सत्र एकचा समावेश आहे.

दूरशिक्षण केंद्राच्या २१ अभ्यास केंद्रांवर परीक्षा होणार आहे. त्याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील 'एक्झाम सेक्शन, एक्झाम शेड्यूल' या लिंकवर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्रावरील परीक्षा केंद्रांची माहिती घ्यावी. परीक्षार्थींनी ओळखपत्र सोबत बाळगावे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाऊन प्रवेशपत्र घ्यावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले.

Hello Kolhapur
Page No. 1 Jan 17, 2019
Powered by: erelego.com

17 JAN 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# फुले दाम्पत्यच शिक्षणाच्या चळवळीचे उदगाते

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची चळवळ निर्माण झाली. समाज परिवर्तन कार्यामध्ये त्यांचे अमूल्य योगदान आहे. त्यामुळे शिक्षणाच्या चळवळीचे फुले दाम्पत्यच उदगाते आहेत, असे प्रतिपादन प्राचार्य टी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत कै. पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेअंतर्गत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आजच्या संदर्भात प्रस्तुतता' या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानामध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. सुभाष साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत कै. पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना प्राचार्य टी. एस. पाटील. सोबत सुभाष साळुंखे, डॉ. भारती पाटील, यशोधन बोकील.**

प्राचार्य पाटील म्हणाले, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाला वैचारिक धन दिले. नव समाज निर्माण होण्यासाठी आहोरात्र कार्यरत राहिले.

**प्राचार्य टी. एस. पाटील यांचे प्रतिपादन**

कृषीवाल संस्कृतीत स्त्री ही समाजप्रमुख होती. सामान्य शेतकरी, कष्टकरी यांच्यावर होत असलेल्या अन्यायास ते सातत्याने विरोध करीत होते. महात्मा फुले शिकत असताना इंग्रज या देशातून कसे हद्दपार होतील यासाठी विचारमग्न असत. शिवाजी महाराजांची समाधी पहिल्यांदा फुलेंनी शोधून काढली. लोकांना गुलामगिरीतून जोपर्यंत मुक्त केले जाणार नाही तोपर्यंत कुठल्याही प्रकारच्या स्वातंत्र्याला अर्थ नाही हे त्यांनी जाणले होते. सावित्रीबाई फुले यांच्या माध्यमातून मुलींसाठी शाळा १८५२-५३ मध्ये सुरू केली. महात्मा ज्योतिबा फुलेंनी वंचितांसाठी शाळा काढली. हे क्रांतीकारी कार्य होते म्हणून त्यावेळेस इंग्रज सरकारने त्यांचा सत्कार केला होता. त्यावेळी ते पंचवीस वर्षांचे होते. अनाथ बालकांचा सांभाळ ते करीत होते. पुढे त्यांनी सत्य शोधक समाजाची स्थापना केली. असे त्यांनी सांगितले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ

# 'शिक्षणाच्या चळवळीचे फुले दाम्पत्य उद्गाते'

कोल्हापूर, ता. १६ : महाराष्ट्रामध्ये वंचितांच्या शिक्षणाची चळवळ महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केली. फुले दाम्पत्य हेच खऱ्या अर्थाने शिक्षण चळवळीचे उद्गाते आहेत, असे प्रतिपादन प्राचार्य टी. एस. पाटील यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेत ते बोलत होते.

मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यानमाला सुरू आहे. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील अध्यक्षस्थानी होत्या. प्राचार्य पाटील म्हणाले, ''मुलींची पहिली शाळा सुरू करून त्यांनी एक नवी दिशा दाखवली. सावित्रीबाई फुले यांनीही अवहेलना सहन करून शाळा सुरू ठेवली. सत्यशोधक चळवळ सुरू केली. फुले दाम्पत्याचे कार्य पाहिले की ते महाराष्ट्रातील शिक्षण चळवळीचे उद्गाते आहेत, असे लक्षात येते.'' डॉ. भारती पाटील म्हणाल्या, ''फुलेंची परंपरा विवेकाधिष्ठीत आहे.'' यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक केले.

Kolhapur, Main
17/01/2019 Page No. 4

लोकमत




शिवाजी विद्यापीठातील पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेमध्ये प्राचार्य टी. एस. पाटील यांनी विचार मांडले. यावेळी सुभाष साळुंखे, भारती पाटील, यशोधन बोकील उपस्थित होते.

# 'फुले दाम्पत्या'मुळे शिक्षणाची चळवळ

## टी. एस. पाटील : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची चळवळ निर्माण झाली. फुले दाम्पत्य हे शिक्षणाच्या चळवळीचे उद्‌गाते आहेत. समाजपरिवर्तन कार्यामध्ये त्यांचे अमूल्य योगदान होते, असे प्रतिपादन प्राचार्य टी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेमध्ये 'महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आजच्या संदर्भात प्रस्तुतता' या विषयावर त्यांनी विचार मांडले.

मानव्यशास्त्र सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या. प्राचार्य पाटील म्हणाले, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाला वैचारिक धन दिले. नवसमाज निर्माण होण्यासाठी ते अहोरात्र कार्यरत राहिले. आपल्या देशामध्ये कृषीधवल संस्कृतीत स्त्री ही समाजप्रमुख होती. सामान्य शेतकरी, कष्टकरी यांच्यावर होत असलेल्या अन्यायास ते सातत्याने विरोध करीत होते. त्यांनी त्यांच्या कार्यातून भारतातील सामान्य वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील होण्यास प्रवृत्त केले.

### भेदाभेद मान्य नव्हते

**आपल्या विचारांचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातिधर्मांतील भेदाभेद त्यांनी कधीही मान्य केले नाही. ते मानवतावादी होते, असे प्राचार्य पाटील यांनी सांगितले.**

आपल्या देशातील लोकांना गुलामगिरीतून जोपर्यंत मुक्त केले जाणार नाही, तोपर्यंत आपल्या देशातील कुठल्याही प्रकारच्या स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त होणार नाही, हे त्यांनी जाणले होते; त्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेतले पाहिजे, यासाठी ते कायम प्रयत्नशील होते. अधिष्ठाता डॉ. पाटील म्हणाल्या, महात्मा फुलेंनी मांडलेली परंपरा प्रामुख्याने विवेकाधिष्ठीत परंपरा आहे. डोळे झाकून नाही, तर डोळे उघडे ठेवून कार्य करणारी महान परंपरा आहे. सावित्रीबाई फुले यांचे अद्वितीय जीवनकार्य होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी पी. बी. साळुंखे यांच्या प्रतिमेस प्रमुख उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुभाष साळुंखे, यशोधन बोकील, आदी उपस्थित होते.

पुढारी

# शिक्षणाच्या चळवळीचे फुले दाम्पत्यच उद्गाते

## प्राचार्य टी. एस. पाटील; विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची चळवळ निर्माण झाली. समाज परिवर्तन कार्यामध्ये त्यांचे अमूल्य योगदान असल्याचे प्रतिपादन प्राचार्य टी. एस. पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत कै.पी.बी.साळुंखे व्याख्यानमाले अंतर्गत 'महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आजच्या संदर्भात प्रस्तुतता' या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानामध्ये प्राचार्य पाटील बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

प्राचार्य पाटील म्हणाले, महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाला वैचारिक धन दिले. नव समाज निर्माण होण्यासाठी ते अहोरात्र कार्यरत राहिले. आपल्या देशामध्ये कृषीवल संस्कृतीत स्त्री ही समाजप्रमुख होती.त्यांनी त्यांच्या कार्यातून भारतातील सामान्य वंचित घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील होण्यास प्रवृत्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी पहिल्यांदा महात्मा फुलेंनी शोधून काढली. महात्मा जोतिबा फुलेंनी वंचितांसाठी शाळा काढली. हे क्रांतिकारी कार्य होते म्हणून त्यावेळेस इंग्रज सरकारने त्यांचा सत्कार केला होता. आपल्या विचारांचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जाती-धर्मातील भेदाभेद त्यांनी कधीही मान्य केली नाही. ते मानवतावादी होते. स्वत: काम करून आपल्या सामाजिक कार्यासाठी पैसे मिळवत होते.

कै.पी.बी.साळुंखे यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सुभाष साळुंखे, यशोधन बोकील उपस्थित होते. कार्यक्रमास विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

लोकमत

# संशोधनाचा उपयोग समाजासाठी करावा

## डी. टी. शिर्के; विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभाग परिषदेचा समारोप

**कोल्हापूर :** संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या युवक-युवतींनी त्यांच्या संशोधनाचा समाजाच्या कल्याणासाठी उपयोग करावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

- दोन दिवसीय परिषदेत देश-परदेशातील तज्ज्ञांकडून मार्गदर्शन
- १५० संशोधकांकडून त्यांचे संशोधन भित्तिपत्रकाच्या माध्यमातून सादर



येथील भौतिकशास्त्र विभागातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारी होते. प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या बहुतांश सुविधा विद्यापीठातील या विभागामध्ये उपलब्ध आहेत. संशोधनाच्या माध्यमातून हा विभाग जागतिक पातळीवर पोहोचला आहे.

या कार्यक्रमात भित्तिपत्रक सादरीकरणातील पारितोषिक विजेते कुणाल बोरसे, अमित भोसले, एस. कोटरेश, डॉ. गणेश आगवणे, सत्यजित पाटील, अखिलेश पाटील यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विज्ञान आणि तंत्रज्ञान अधिविभागाचे अधिष्ठाता प्रा. पी. एस. पाटील, डॉ. नीलेश तारवाळ, आदी उपस्थित होते. संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर यांनी आभार मानले. दरम्यान, या दोन दिवसीय परिषदेत देश परदेशातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. १५० संशोधकांनी त्यांचे संशोधन भित्तिपत्रकाच्या माध्यमातून सादर केले. या भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्रा. विजया पुरी, आर. एम. माने यांनी केले.

लोकमत

आदित्य वेल्हाळ



कोल्हापुरात बुधवारी शाहू स्मारक भवनमध्ये 'मराठी जैन साहित्य (१८५० ते २०००)' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून राजन गवस, महावीर शास्त्री, संजय दुबे, महावीर कंडारकर, रणधीर शिंदे, गोमटेश्वर पाटील उपस्थित होते.

# जैन साहित्यातून सत्याच्या पैलूंचा शोध

## आ. ह. साळुंखे : 'मराठी जैन साहित्य' ग्रंथाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जैन धर्माचे साहित्य हे मराठी भाषिकांचे साहित्य आहे. त्यातून संपूर्ण मराठी समाज, संस्कृतीचे दर्शन घडते. या साहित्याने अनेकांतवादानुसार सत्याच्या अनेक पैलूंचा शोध घेण्याचे काम केले आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी बुधवारी केले.

येथील डॉ. गोमटेश्वर पाटील लिखित 'मराठी जैन साहित्य (१८५० ते २०००)' या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. शाहू स्मारक भवनमध्ये नवी दिल्लीतील भारतीय ज्ञानपीठ आणि शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे आयोजित या कार्यक्रमास भारतीय ज्ञानपीठाचे प्रतिनिधी संजय दुबे, जैन साहित्याचे अभ्यासक प्रा. महावीर कंडारकर, 'जैनबोधक' नियतकालिकाचे संपादक डॉ. महावीर शास्त्री प्रमुख उपस्थित होते.

संजय दुबे म्हणाले, भारतीय ज्ञानपीठतर्फे प्राकृत, पाली, आदी भाषांच्या अभ्यासासाठी प्रोत्साहन देण्यात येते. पूर्वजांच्या जिवंत विचारांनीच सांस्कृतिक वैभव स्पष्ट करता येत असल्याने आपण पूर्वजांना विसरता कामा नये. यावेळी प्रा. महावीर कंडारकर, डॉ. महावीर शास्त्री यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी प्राचार्य राजेंद्र कुंभार, डी. डी. मगदूम, राजेंद्र लोखंडे, सुषमा रोटे, कुंतीनाथ करके, बी. ए. चौगुले, आदिनाथ कुरुंदवाडे, आदी उपस्थित होते.डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

### ज्येष्ठ विचारवंत साळुंखे म्हणाले

- वर्धमान महावीरांना सर्व समाजाविषयी करुणा होती. त्यांनी लोकांना समजणाऱ्या प्राकृत भाषेत उपदेश केले.
- तत्कालीन समाजाच्या बोलीभाषेत व्यक्त होणारे साहित्य भाषिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.
- भाषिकदृष्ट्या जैन साहित्य महत्त्वाचे आहे. त्याचा अभ्यास व्हावा.

### बोली भाषांचा अभ्यास व्हावा

बोली आणि साहित्य याबाबत दुर्मीळ हस्तलिखितांचा अभ्यास व्हावा. व्याकरणदृष्ट्या आपण वापरत असलेला 'शुद्धलेखन' हा शब्द न्यूनगंड निर्माण करणारा असल्याने त्याऐवजी 'प्रमाणभाषा' हा शब्द वापरला पाहिजे, असे डॉ. गवस यांनी यावेळी सांगितले.

पुढारी

# जैन साहित्य हे मराठी भाषिकांचे साहित्य

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वर्धमान महावीरांना सर्व समाजाविषयी करुणा होती. त्यामुळेच त्यांनी संस्कृतऐवजी लोकांना समजणाऱ्या प्राकृत भाषेत उपदेश केले. जैन धर्माचे साहित्य हे संपूर्ण मराठी भाषिकांचे साहित्य असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी बुधवारी येथे केले.

भारतीय ज्ञानपीठ आणि शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने डॉ. गोमटेश्वर पाटील लिखित 'मराठी जैन साहित्य (१८५० ते २०००)' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. साळुंखे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

शाहू स्मारक मिनी हॉल येथे झालेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. राजन गवस म्हणाले, बोलीभाषांचा अभ्यास झाला पाहिजे. व्याकरणदृष्ट्या आपण वापरत असलेला शुद्धलेखन हा शब्द न्यूनगंड निर्माण करणारा आहे. त्यामुळे त्याऐवजी प्रमाणभाषा हा शब्द वापरला पाहिजे. भारतीय ज्ञानपीठाचे प्रतिनिधी संजय दुबे म्हणाले, ज्ञानपीठाकडे आपण साहित्य पाठवावे, आम्ही त्याचे निश्चितपणे स्वागत करतो.

आपण पूर्वजांना विसरून चालणार नाही. कारण पूर्वजांच्या जिवंत विचारांनीच सांस्कृतिक वैभव स्पष्ट करता येते. प्रा. महावीर कंडारकर म्हणाले, जैन समाज हा स्थितिशील आणि गतिशील आहे. जैन साहित्य हे आदर्शवादी साहित्य आहे.

कार्यक्रमास लेखक पाटील यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. महावीर शास्त्री, डॉ. महावीर अक्कोळे, डॉ. सुषमा रोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'जैन मराठी साहित्य' ग्रंथ उपयुक्त

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे : 'मराठी जैन साहित्य (१८५० ते २०००)'ग्रंथाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर


'जैन मराठी साहित्य' ग्रंथ हा अखिल मराठी जगताला उपयुक्त आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत (सातारा) डॉ. आ. ह. साळुंखे यांनी केले. शाहू स्मारक भवन (मिनी हॉल) येथे गुरुवारी डॉ. गोमटेश पाटील यांच्या 'मराठी जैन साहित्य (१८५० ते २०००)' या ग्रंथाचे प्रकाशन समारंभात अध्यक्षस्थानी ते बोलत होते. डॉ. साळुंखे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

समारंभास भारतीय ज्ञानपीठचे (नवी दिल्ली) संजय दुबे, जैन साहित्याचे अभ्यासक (सातारा) महावीर कंडारकर, जैन बोधकचे संपादक डॉ. महावीर शास्त्री यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय ज्ञानपीठ नवी दिल्ली पुरस्कृत व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मराठी विभागातर्फे या समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. साळुंखे म्हणाले, जैन धर्म हा मानवतावादी, सर्वसमावेशक आहे, या धर्माने सांगितलेला अनेकांत वाद सर्व धर्मियांना नेहमीच उपयुक्त राहील. अनेकांत वाद हा दुसऱ्याला समजून घेणारा आहे. सत्याच्या मार्गावर जाणारा कष्टकरी जैन धर्म असून हा मराठी भाषेतील हा ग्रंथ गौरवास्पद आहे.

डॉ. राजन गवस म्हणाले, दुर्लक्षित समाजोपयोगी साहित्याला उजाळा देण्याचे काम या ग्रंथाने केले आहे. डॉ. महावीर शास्त्री यांनी अशा पद्धतीचे साहित्य अन्य धर्मियांमध्येही उपलब्ध आहे. तसेच अन्य धर्मियांचे साहित्य खितपत पडले आहे, ते साहित्य देखिल समाजाच्या उद्धारासाठी व विकासासाठी समाजापुढे येण्याची गरज आहे. ग्रंथ लेखकाचे मनोगत डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस, भारतीय ज्ञानपीठचे प्रतिनिधी संजय दुबे यांनी या समारंभाचे आयोजन केले होते. परिचय डॉ. रणजित शिंदे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. राजेश पाटील यांनी केले. आभार डॉ. शरद गायकवाड यांनी मानले.




कोल्हापूर : 'मराठी जैन साहित्य' ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संजय दुबे, महावीर कंडारकर, डॉ. महावीर शास्त्री, डॉ. राजन गवस आदी.

सकाळ

# जैन साहित्याला समृद्ध वारसा

## डॉ. आ. ह. साळुंखे; प्रा. डॉ. पाटील यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : जैन साहित्याला समृद्ध वारसा असून भगवान महावीरांची शिकवण वर्तमानातही दिशादर्शक असल्याचे स्पष्ट मत आज ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी व्यक्त केले. येथील प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील लिखित 'मराठी जैन साहित्य १८५० ते २०००' या ग्रंथाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. भारतीय ज्ञानपीठ (नवी दिल्ली) आणि शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू स्मारक भवनात कार्यक्रम झाला.



**कोल्हापूर : भारतीय ज्ञानपीठ व शिवाजी विद्यापीठ मराठी विभागातर्फे बुधवारी डॉ. गोमटेश्वर पाटील लिखित 'मराठी जैन साहित्य १८५० ते २०००' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी डावीकडून डॉ. राजन गवस, संजय दुबे, प्रा. महावीर कंडारकर, डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. महावीर शास्त्री, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. गोमटेश्वर पाटील.**

डॉ. साळुंखे यांनी एकूणच जैन साहित्य, त्यातील प्रवाह आणि वर्तमान अशा विविध अंगांनी संवाद साधला. ते म्हणाले, ''मराठी जैन साहित्याच्या अभ्यासातून सकल मराठी समुदायासाठी सुखी व समाधानी जगण्याची प्रेरणा मिळते. जैन साहित्य असो किंवा कुठल्याही धर्मातील दुर्लक्षित साहित्याचे प्रकाशन ही येत्या काळाची गरज आहे.''

शिवाजी विद्यापीठ मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी दुर्लक्षित समाजोपयोगी साहित्याला पुन्हा उजाळा मिळावा, यासाठी प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. महावीर शास्त्री यांनी साहित्य कुठलेही असो ते केवळ कपाटात बंदिस्त राहून चालणार नाही. त्याचा समाजातील प्रत्येक घटकाला उपयोग झाला पाहिजे, असे सांगितले.

ज्येष्ठ अनुवादक महावीर कंडारकर, भारतीय ज्ञानपीठाचे प्रतिनिधी संजय दुबे यांचीही यावेळी मनोगते झाली. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी एकूणच लेखनाचा प्रवास सांगितला. डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Main
17/01/2019 Page No. 5